**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १८/२०१७-१८/२५९ दिनांक: ११.०८.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. १८/२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| श्रीमती पुष्पावती आप्पासाो पाटील तर्फे वारस<br>श्री महावीर आप्पासाो पाटील<br>मु.पो. नादणी ता. शिरोळ<br>जि. कोल्हापूर | **तक्रार**<br><br>**अर्जदार**<br>**(ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br><br>३) कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय जयसिंगपूर<br><br>४) उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपाविभाग शिरोळ | **विरुध्द पक्षकार** |

**कोरम:-** १.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी प्रदिप वि. खपली , सदस्य सचिव, ग्राहक तक्रार,निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे - न्याय निर्णय देत आहे.

## ग्राहकांचे गा-हाणे

१) कृषी ग्राहक श्रीमती पुष्पावती आप्पासो पाटील (मयत) नांदणी यांचे नांवे ग्राहक क्र. शेती-२५२५३००१८७३२ आणि ग्राहक क्र.२५२५३००१९०७१हे दोन्ही कनेक्शन ९ जानेवारी २००० रोजी कायम स्वरुपी बंद करण्यात आले आहे. त्यांचे वारस श्री महावीर आप्पासो पाटील नांदणी यांनी वरील दोन्ही कनेक्शन "नव प्रकाश योजने" अंतर्गत सुरु करण्याबाबतची तक्रार अंतर्गत निवारण कक्षाकडे केली असता दिनांक २०-०५-२०१७ चे आदेशानुसार त्यांचा मागणी अर्ज फेटाळण्यात आला आहे. त्यामुळे त्याबद्दल नाराज होऊन त्यांनी दि. २६-०५-२०१७ रोजी वरील मागणी परिशिष्ट "अ" मध्ये त्या मंचाकडे सादर केले आहे.

## वि.प. ची भूमिका

२) महावितरणतर्फे श्री सुनिल धो आक्कीवाटे,उपकार्यकारी अभियंता उपविभाग शिरोळ श्री महेश साळोखे, उपव्यस्थापक(विवले) जयसिंगपूर विभाग आणि श्री अनुप बेडीगिरी, उच्चस्तर लिपिक (लेखा) शिरोळ उपविभाग हे उपस्थित होते.

३) वि.प.तर्फे उपकार्यकारी अभियंता शिरोळ उपविभाग यांनी असे सांगितले की, श्रीमती पुष्पावती आप्पासो पाटील (मयत ) यांचे नावे असेले वरील दोन्ही कृषी जोडण्या थकबाकी असल्यामुळे ९ जानेवारी २००० रोजी कायम स्वरुपी रोजी बंद करण्यात आली आहेत. व त्यांचे खातेवरील नोंदणी नुसार माहे जून २००४ अखेर पर्यन्तची थकबाकी अनुक्रमे रु. ८,२७१.०० व रु. ८,२७१.१२ होती.तत्कालीन म.रा.वि.मंडळ योजनेनुसार सदर ग्राहकाची थकबाकी माहे सप्टेंबर २००४ मध्ये वजा करणेत येऊन त्यांचेवर असलेली थकबाकी निरंक असल्याचे दिसते. नवप्रकाश योजना ही थकबकीदार ग्राहकासाठी आहे त्यामुळे वरील दोनही कनेक्शन माहिती तंत्रज्ञान विभाग, कोल्हापूर यांनी दिनांक ११ जानेवारी २०१७ रोजी पाठविलेल्या यादीमध्ये समाविष्ट नाहीत.

सबब ग्राहकाच्या अर्जाप्रमाणे जुन्या विज जोडण्या पुन्हा चालू करता येत नाहीत. तथापि जर ग्राहकाने नविन जोडणीसाठी नियमाप्रमाणे सर्व कागद पत्राची पुर्तता करुन दिली तर आम्ही विज जोडणी देण्यास तयार आहोत.

ग्राहक व महावितरण तर्फे सादर केलेल्या सर्व कागद पत्राचे वाचन करण्यात आले आणि दोन्ही पक्षानी आपले संपूर्ण म्हणणे विस्तारीत मंचासमोर सादर केले.

वरील सर्व निवेदने तोंडी चर्चा यामधून खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) कायम स्वरुपी विद्युत पुरवठा बंद असलेल्या माहकीचा विज पुरवठा नवप्रकाश योजने खाली पुन्हा चालू करता येईल का?

उत्तर:- नाही

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

२) ग्राहकास नविन  वीज जोडणी जोडणी देता येईल का?

उत्तरः- होय

३) अंतिम आदेश काय?

उत्तरः- शेवटी नमूद केलेप्रमाणे.

## कारणमिमांसा

ग्राहकाने जुन्या जोडण्या पुन्हा चालू करण्यासाठी विनंती केली आहे. कॉलम ३ मध्ये कारण नमूद केल्याप्रमाणे ते थकबाकीदार नाहीत. त्यामुळे या योजनेस ते पात्र नाहीत यावर मंचाचे एकमत झाले आहे.

ग्राहकास पाणी उपसण्यासाठी विज जोडणी आवश्यक आहे. यापूर्वी ही ते संबंधीत खात्याकडून योग्य ते परवाने प्राप्त करुन पाणी उपसा वापर जुन्या विज जोडणीच्या आधारे करीत होते. आजही त्यांची तिच मागणी आहे. ग्राहक महाविर पाटील यानी मला विद्युत जोडणीचे  त्वरीत आवश्यकता आहे. त्यासाठी लागणारी योग्य ती सर्व कागदपत्रे महावितरणला देण्यास तयार असल्याचे मंचासमोर मान्य केले आहे.

उपकार्यकारी अभियंता श्री अक्किवाटे यांनी नविन विज जोडणीसाठी लागणारे सर्व निकष पूर्ण करुन दिल्यावर आम्ही त्वरीत विज जोडणी देऊ असे मान्य केले आहे.

ग्राहकाने योग्य ती कागदपत्रे सादर केल्यानंतर तांत्रिक बाबीत न अडकवता ग्राहकाच्या तोंडी विनंती प्रमाणे त्वरीत विज जोडणी द्यावी असे मंचातर्फे वि.प. यांना सांगण्यात आले. ग्राहक अर्जावर वि.प. यांनी मंचासमोर हे सर्व मान्य केलेले आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

### आदेश

१) ग्राहकाची नव प्रकाश योजने अंतर्गत विज जोडणीची मागणी नामंजूर करण्यात येत आहे.

२) ग्राहकाने नविन कृषी विज जोडणी करिता सर्व बाबीची नियमाप्रमाणे पुर्तता  करुन दिल्यानंतर त्यांना त्वरीत विज जोडणी देण्यात यावी.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार  निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास  कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण